**Publication:** Deshonnati
**Date:** 12/09/2013
**Edition:** Nagpur
**Page No:** 03
**Headline:** Shouvik De and Kshitiz Gupta are “Nagpur Smart Tech Wizards”

# शौविक डे व क्षितीज गुप्ता 'नागपूर स्मार्ट टेक विझार्ड्स'

*प्रतिनिधी / ११ सप्टेंबर*

नागपूर : टाटा कन्सलन्सी सर्व्हिसेसच्या वतीने आयोजन टीसीएस आयटी' विझ २०१३ स्पर्धेच्या प्राथमिक फेरीत शौविक डे आणि क्षितीज गुप्ता यांनी संयुक्तपणे स्मार्ट टेक विझार्ड्स २०१३ प्रथम क्रमांक प्राप्त करीत नागपूर स्मार्ट टेक विझार्ड्स २०१३ पुरस्कार पटकाविला. यानंतर होणाऱ्या महाअंतिम फेरीत नागपूर विभागाचे प्रतिनिधित्व करण्याचा बहुमान पटकाविला.

यासह शहादाब खान आणि विश्वरूप खानोरकर या जोडीने द्वितीय क्रमांक पटकाविला. विजेत्या स्पर्धकांना मानचिन्ह व प्रत्येकी आयपॉड तर उपविजेत्यांना गॅलेक्सी टॅब्लेट देऊन गौरव करण्यात आला.

बुधवारी डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात आयोजित स्पर्धेत शहरातील विविध शाळांमधील ११०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सोशल मीडिया आऊटरिच उपक्रमाचा एक भाग म्हणून विद्यार्थ्यांना सहभागी करण्याच्या उद्देशाने आयोजित आली होती माहिती तंत्रज्ञान ज्यात इंटरनेट, आयटी बझवर्ड्स, आयटी आणि संज्ञापन कंपनीच्या जाहिराती मनोरंजन, पुस्तक, संगीत, चित्रपट, जाहिरात, आदी क्षेत्रात तंत्रज्ञानाचा प्रभाव असलेल्या प्रश्नांचा यात समावेश होता.

टीसीएस आयटी विझच्या वतीने या प्रकारच्या स्पर्धा प्रादेशिक स्तरावर आयोजित करण्यात येतात. यामध्ये प्रामुख्याने हैद्राबाद, अहमदाबाद, कोलकाता, बंगलोर, चेन्नई, पुणे आदी. यावेळी प्रादेशिक स्तरावर विजेत्या स्पर्धकांची संयुक्त अरब अमिरातीे महाअंतिम स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे. यावेळी विजेत्या स्पर्धकांना टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसचे मुंबई उपाध्यक्ष आणि बिझनेस ऑपरेशनचे प्रमुख चैतन्य सोठ यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात आला.